भारत सरकार
पत्र सूचना कार्यालय
मुंबई

**विशेष लेख**

# "घे उंच भरारी"

भावना गोखले




दरवर्षी 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो तसा यावर्षीही विविध स्तरांवर सर्वत्र साजरा करण्यात आला. भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी प्रातिनिधिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करून देशाच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या, बहू कल्पकता असणाऱ्या महिलांचा सत्कार या निमित्ताने करण्यात येतो. यावर्षीची संकल्पना "बी बोल्ड फॉर चेंज ही आहे. यावर्षी देशभरातून 31 महिलांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येऊन त्यांना 8 मार्चला म्हणजे जागतिक महिला दिनी गौरविण्यात आले. आज पासून प्रत्येक महिन्यात दोन अशा 31 जणींच्या कामगिरीची ओळख "घे भरारी' या मालिकेमधून करून देणार आहोत. आपले अभिप्राय आम्हाला pibmarathi@gmail.com आणि pibmumbai@gmail.com या मेल वर अवश्य कळवा. या मालिकेची सशक्सत नारी आहे संगीता अय्यर




संगीता अय्यर जागतिक पातळीवरील डॉक्युमेंटरी आणि लघु  चित्रपटांच्या दुनियेत उगवणारा एक तारा,  मुख्यतः दिग्दर्शनासाठी लोकप्रिय. तिची ' गॉड्स इन  शॅकल्स' ही डॉक्युमेंटरी आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्टतेसाठी नावाजली गेली. दक्षिण भारतातील महोत्सव, त्यासाठी आशियन हत्तींचा मोठ्या प्रमाणावर करण्यात येणारा अनधिकृत  उपयोग  आणि या मागची काळी बाजू प्रकाशात आणण्याचे काम या डॉक्युमेंटरीने केले आहे. हे हत्ती जंगलातून बेकायदेशीर पकडून आणून नफ्यासाठी त्यांच्यावर करण्यात येणारे अत्याचार या डॉक्युमेंटरीमध्ये चित्रित केले आहे. यासाठी संस्कृती आणि धर्म यांचा आधार घेण्यात आला हे विशेष.

भारतीय हत्तींच्या विषयी विचारले असता संगीता म्हणाली की, बेकायदेशीरपणे पकडण्यात आलेल्या हत्तींना फारच क्रूर वागणूक देतात त्यांना  तळपत्या उन्हात ठेवतात, त्यांना पुरेसे अन्न व पाण्याविना ठेवल्याने ते उन्मळून पडतात किंवा मरतात. वर्ष 2017 मध्ये 4 हत्ती मेलेत,  तर 2016मध्ये त्यांना देण्यात येणाऱ्या आत्यंतिक  शारीरिक यातनांमुळे, ट्युबरकोलॅसिस, पाय आणि पोटांच्या विकारांकडे  करण्यात आलेल्या दुर्लक्षित व्यवहारामुळे  26 हत्ती  दगावले.

केरळ राज्यातील पलक्कड येथे संगीताचा जन्म झाला. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण भारतात झाल्यानंतर 1984 मध्ये तिने जीवशास्त्रात  विज्ञान पदवी प्राप्त करून पर्यावरण शिक्षण आणि संदेशवहन या विषयात पदव्युत्तर अभ्यास केला तसेच टोरांटो कॅनडा येथील हंबर महाविद्यालयात ब्रॉडकास्ट जर्नालिझम पद्युत्तर अभयसक्रम ही पूर्ण केला.  ती  दक्षिण आफ्रिकेच्या नैरोबी   आणि बर्मुडा (कॅरिबियन ) येथे वास्तव्यास होती आणि आता कॅनडा च्या टोरोंटो शहरात राहते.

संगीताला विविध पुरस्कार मिळाले असून यामध्ये 2013 मध्ये मिळालेल्या ' नेतृत्व, शाश्वत आणि वैयक्तिक विकासा साठीच्या संस्थापक पुरस्काराचा समावेश आहे. इंडोनेशियामध्ये नुकत्याच झालेल्या पर्यावरण आरोग्य आणि सांस्कृतिक चित्रपट महोत्सवामध्ये तिला तिच्या ," मास्टर्स थिसीस डॉक्युमेंटरी, कॅनेक्टींग द डॉट्स : टेलिव्हिजन न्यूज मीडिया अँड क्लायमेट चेंज' साठी उत्कृष्टता पुरस्कार मिळाला .

2008 मध्ये संगीताला लोकप्रिय बरमूडा मासिकाने "बेस्ट प्रसारण पत्रकार", हा किताब दिला. तिने बर्मुडा राष्ट्रीय ट्रस्ट या संस्थेसाठी 13 भागांमध्ये बनविलेल्या अव्वल पर्यावरण जागरूकतेवरील डॉक्युमेंटरीसाठी 'द फॉरेस्ट त्रिमिन्घम' हा पुरस्कार देण्यात आला. या मालिकेचे सर्वोच्च नियामक मंडळ आणि विधानसभा हाऊस यांनी विशेष कौतुक केले असून सध्या हि मालिका प्रत्येक शाळेत शैक्षणिक उपयुक्तता म्हणून दाखविली जात आहे.





' गॉड इन शॅकेल्स' या माहितीपटासाठी घेण्यात आलेल्या परिश्रमांबद्दल विचारले असता संगीत म्हणाली की तीन वर्ष सतत माहिती मिळवणे, खोल जंगलात जाऊन फुटेज मिळवणे, कधी निसर्गाची साथ तर कधी कठोर , रुक्ष झालेला निसर्ग , कधी सामान्य तापमान तर कधी सूर्य नुसता आग ओकायचा, रानटी प्राण्यांचा त्रास, गुप्त कॅमरा, व्हिडिओ द्वारे रेकॉर्डडींग करतांना कमालीची दमणूक व्हायची अशा परिस्थिती माहितीपटाचे रेकॉर्डिंग केले.. जवळपास 200 तासांचे फुटेज माहितीपटासाठी तयार करण्यात आले. केरळ मधील हत्ती, त्यांचे मालक आणि ब्रोकर यांच्या व्यवहारावरील (जे नफा मिळविण्यासाठी हत्तींना भाड्याने देतात ) शॉट्स असल्याने माहितीपटाचे स्टील शॉट्स भारताच्या सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले आहेत.

'युनायटेड नेशन्स जनरल विधानसभेत १०व्या आंतरराष्ट्रीय हत्ती चित्रपट महोत्सवामध्ये सहभागासाठी 'गॉड इन शॅकेल्स' सादर करण्यात आल्यानंतर माहितीपटाला नामांकन मिळाले आणि 10 आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव पुरस्कार प्राप्त झाले. या मध्ये मार्च 2017 मध्ये भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समावेश आहे. http://vimeo.com/156208028 या लिंकद्वारे 'गॉड इन शॅकेल्स' चे 30

सेकंदाचे ट्रेलर तुम्ही बघू शकता . नॅशनल जिओग्राफिक च्या पहिल्या पानावर लीड स्टोरी म्हणून प्रकाशित करण्यात आली आहे. लंडन टेलिग्राफ आणि काही प्रमुख दूरदर्शन चॅनेल्स तसेच जगातील विविध वृत्तपत्रांनी या माहिती पटाबद्दल भरभरून लेख प्रकाशित केलेत. अधिक माहिती साठी www.godsinshackles.com या संकेत स्थळाला भेट द्या.

व्हॉईस फॉर आशियाई एलिफन्ट सोसाइटी बद्दल विचारले असता संगीत म्हणाली की, जुन 2013 मध्ये माहितीपट प्रसारित झाल्यानंतर तिने भारतातील हत्तीच्या समस्यांना वाचा फोडावी या उद्देशाने वाईस फॉर आशियाई एलिफन्ट सोसाइटीची निर्मिती केली. ही सोसाइटी केरळ मधील हत्तीच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या वर्तमान स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून कार्य करत आहे. संगीता या संस्थेची संस्थापक आणि अध्यक्ष म्हणून काम बघते. काम निरंतनपणे चालू आहे.

कॅनडा च्या डिस्कवरी चॅनेल वरील निसर्ग आणि वन्य जीवनावर आधारित डेली प्लॅनेट या मालिकेसाठी रोज अहवाल वाचन तसेच बर्मुडा येथील एबीसी/सीबीएस या वाहिन्यांची सूत्र संचलनाची जबाबदारी संगीताने स्वीकारली . ती बर्मुडा पर्यावरण युतीची सहसंस्थापक आहे. मदर अर्थ संघटनेला जोडल्या गेल्या पासून संगीताला मदर अर्थ बद्दल अध्यात्मिक संलग्नता नेहमीच वाटत आली आहे. जेंव्हा मी 1999 ला आरोग्य आणि पर्यावरण पत्रकार म्हणून करियर ला सुरवात केली तेंव्हापासून निसर्ग आणि वन्यजीवना बद्दल चा माझा अनुभव असा आहे की माझ्या निरंतर कामाचा थकवा आणि ताण कमी करण्यासाठी हे काम एक आरोग्य स्रोत आहे. बरेच तास कामांवर खर्च केल्यानंतर आंतरिक इच्छा शक्तीच्या जोरावर मी पुन्हा पुन्हा हा अनुभव हस्तांतरित करू शकते. ती सध्या हाफिन्गटन पोस्ट साठी एक सहयोगी लेखक म्हणून लिखाण करत आहे.

**हत्तींचा छळ टाळण्यासाठी लोकांच्या मानसिकतेत बदल घडून यावा यासाठी तुम्ही काय उपाय, मापदंड योजलेत ?**

खूप भावनिक होऊन संगीत म्हणाली, प्रत्यक्षात खूपच कमी म्हणजे केवळ 40,000 आशियाई हत्ती जगात बाकी आहे. यामध्ये बदल अपरिहार्य आहे, पण तो एका रात्रीतून होणार नाही. अशा परिस्थितीत हत्तीची पिळवणूक किती दिवस आणि कशी सहन करणार? लहानपणीच हत्तींना त्यांच्या कळपापासून दूर केले जाते, तरुणपणी त्यांच्या समागमाच्या नैसर्गिक/मूलभूत अधिकारांपासून त्यांना वंचित ठेवले जाते असेच चालू राहिले तर त्यांच्या प्रजाती वाढणार कशा ?

आम्हाला मालकाला , ब्रोकर्सला आणि मदतगारांना पर्यायी व्यवस्था देण्याची गरज आहे कारण हा उद्योग खूप मोठा आहे. त्रिशूर पुरम येथे बघितले तर सर्व विक्रेते एकत्रितपणे हा व्यवसाय करतात जो

बराच पैसे कमवून देतो , पर्यटक खुश असतात कारण त्यांना जंगल सफारीचा आनंद हत्तीच्या पाठीवर बसून मिळाला असतो, मग तो लहान हत्ती का असेना ? कोणी या बाबत हस्तक्षेप करीत नाही. म्हणजेच पुन्हा विक्रेत्यांपर्यंत संदेश पोहचविण्यासाठी बहूकलमी पध्दत असण्याची आवश्यकता आहे.

जेव्हा लोकांना शिक्षित करायचे आहे तेव्हा पर्यटनाची संपूर्ण कल्पना बदलणे आवश्यक आहे. केरळ पर्यटनाचा संपूर्ण भर त्रिशूरपूरमवर आहे पण मी इथे इको-पर्यटन पध्दती सुचवेन, ही पर्यटकांसाठी एक सुवर्णसंधी राहील. अशा अनेक संधी केरळ मध्ये आहेत, विशेषतः प्रगत सांस्कृतिक नृत्य आणि पारंपरिक आयुर्वेदिक औषधी उपचार पध्दती जी संपूर्ण जगाला केरळच्या पायाशी आणून सोडेल. आणि हे फक्त तेव्हाच शक्य आहे जेव्हा पर्यटन पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल घडेल.

**आपण एक महिला वन्यजीव पत्रकार आहात, जेव्हा अरण्यात हत्तींचे शूटिंग करण्यासाठी जाता तेव्हा तुम्हाला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते ? विशेषतः हत्तींच्या छळवणुकीचे व्हिडिओ काढतांना कोणत्या आव्हानात्मक समस्या आहेत?**

संगीता : मी माझ्या स्त्री असण्याचा माझ्या व्यवसायामध्ये कधी बाऊ केला नाही . किंबहुना मला माझ्या महिला असण्याचा फायदा झाला. कुठल्याही महोत्सवातील हत्तींचे फोटो शूट करतांना माहूत परवानगी नाकारायचा अशावेळी नियोजन , आणि योग्य व्यवस्था करून चुपचाप विडिओ शूटिंग केले विरोध असूनही बऱ्याच भयानक इमेजेस/फोटोज ताब्यात घेतले. तो एक सार्वजनिक कार्यक्रम होता त्यांनी प्रतिकार करण्याचे काहीच कारण नव्हते , त्यांनी तसे कबूलही केले मग त्यांनी कॅमेरे का जप्त केले म्हणजेच त्यांना माहिती होते कि ते जे काही करत आहे ते चुकीचे आहे.

**हे हत्ती मंदिरांच्या मालकीचे आहेत का? जर असतील तर मुक्या प्राण्यांना देण्यात येणाऱ्या त्रासाबद्दल त्यांना शिक्षा झाली का?**

**संगीता अय्यर**: हत्ती मुख्यतः खाजगी नागरिकांच्या मालकीचे आहेत, आणि त्यापैकी काहींनी भक्तिभावाने हत्तींना मंदिराला दान केले आहे असेही काही निस्वार्थी भक्त आहेत परंतु त्यांना वास्तवाची कल्पना नाही की इथे हत्तींचा व्यापार चालतो. व्यापार करणारे धर्म आणि संस्कृतीचा आधार घेतात याची चीड येते. हत्ती युद्धांत वापरले जायचे जेव्हा आपल्याकडे अत्याधुनिक शस्त्रे, अत्याधुनिक यंत्रणा नव्हती परंतु आता सर्व असूनही भारतीय त्यांचे मूळ अध्यात्मिक देणे विसरले आहेत. आमच्या भारतीय संस्कृतीत मुक्या प्राण्यांबद्दल दया, प्रेम, सहानुभूती सांगितली आहे परंतु त्रिशूरपूरमचे चित्र वेगळेच आहे तिथे बेधडकपणे हत्तींची छळवणूक केली जाते

**देवाच्या नावाने प्राणी शोषण हा अत्यंत क्रूर प्रकार आहे , हा थांबविण्यासाठी तुम्ही  काय पाऊले उचललीत** ?

संगीता अय्यर: कुठल्याही धर्म ग्रंथात मग तो हिंदूंचा असो, मुस्लिम असो किंवा ख्रिश्चन असो हत्तींच्या उत्सवातील वापराला परवानगी आहे. परंतु धर्माच्या नावाखाली या लोकांनी अत्यंत बुद्धिमान असलेल्या प्राण्याचा  व्यापार मांडला. लोक आता कुठे जागरूक होत आहेत त्यांना सत्याची कल्पना येत आहे. आणि म्हणूनच अशा माहिती चित्रपटांद्वारे लोक शिक्षणाचे काम आवश्यक आहे ज्यामुळे  त्यांचा दृष्टिकोन बदलेल त्याची समज बदलेल.

**तुम्ही टीम वर्क करतांना सामाजिक आणि भावनिक अडचणींना कशा सामोरी जाता**?

खरे बघता माझ्या प्रॉडक्शन टीममध्ये संगीतकाराव्यतिरिक्त मी एकटीच महिला आहे आणि आम्ही सर्व व्यवसायिक पातळीवर काम करत असल्याने प्रत्येकाला आपल्या कामाची जाणीव आहे. एका संपादकाच्या त्रासदायक वर्तणुकीमुळे मी त्याला एकदा झापले होते एवढंच. मी खंबीर असल्याने असे प्रसंग शिताफीने हाताळू शकते तसेच मी  माझ्या टीमला नेहमीच उत्कृष्ट  कामासाठी अभिप्रेरित करीत असते त्यामुळे टीममध्ये एक व्यासायिक उत्साहित वातावरण असते.

संगीताने केलेल्या कार्याचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की, अत्यंत अवघड काम एक स्त्री असूनही, सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून संगीताने केले. ती आशियातील हत्तींच्या मूलभूत अधिकारासाठी लढली, तिने हत्तींना देत असलेल्या गैरवर्तणुकीबद्दल आवाज उठवला. संगीता  हे स्त्रीशक्तीचे  उत्तम उदाहरण आहे.

आपल्याला कळत नाही केव्हा कुठे नैसर्गिक शक्ती कोणाच्या रूपाने शाश्वत विकासाचे  काम करून घेईल. एकदा का क्लिक झाले की व्यक्ती झपाटल्यासारखी कामाला लागते संगीताचा प्रवास बघितल्यास  'गॉड क्लिक'  खरे असल्याचे जाणवेल . या नारी  शक्तीचा योग्य सत्कार न  झाल्यास नवल.

भारताचे राष्ट्रपती श्री प्रणव मुखर्जी यांनी संगीताचा दिनांक 8 मार्च या महिलादिनी  "नारी  शक्ती पुरस्कार" देऊन गौरव केला. तिचे विशेष अभिनंदन करून  ही  मुलाखत  इथेच थांबवू या.

संदर्भ :

http://www.godsinshackles.com/
http://www.godsinshackles.com/news-coverage/

http://www.godsinshackles.com/gallery/
http://www.huffingtonpost.com/sangita-iyer/
http://www.huffingtonpost.ca/sangita-iyer/kinship-with-nature_b_9817138.html
https://www.facebook.com/sangita.voiceforasianelephants/about?section=education&pnref=about
https://www.facebook.com/sangita.voiceforasianelephants